# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०५/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन कुही हद्दीत दारू तस्करावर कुही पोलीसांची धडक कारवाई

पोस्टे. कुही हद्दीतील खरबी परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध्य वाहतुक होत असल्याची गोपनिय माहीती कुही पोलीसांना मिळाल्याने दिनांक ०३/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथिल अधिकारी व स्टाफसह वरिष्ठांना माहीती देवुन मा. दिपक अग्रवाल सा. भापास सहा. पोलीस अधिक्षक तथा ठाणे प्रभारी यांचे नेतृत्वात खरबी शिवारात जावुन पेट्रोलींग दरम्यान खरबी शिवारात भगवान वाडीभस्मे याच्या घराची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचा घरातुन देशी दारूचा १९२ निपा ९० एम एल मापाचा किमती ६७२० रू. चा मुद्देमाल जप्त करूण पुढील कार्यवाही करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ उपविभागीय पोलीस अधिकारी श्री राजा पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार IPS दिपक अग्रवाल पोउपनि हरिहर सोनकुसरे, पोशि रविद्र मारवदे यांनी यशस्वीपणे पुर्ण कलली आहे.



## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण ७६५००००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ दिनांक ०३.०५.२०२४ रोजी अवैध धंदयांवर आळा घालणेकामी पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता खात्रीशिर माहिती मिळाली की, मौजा निलज ते उमरेड रोड भिवापुर व मौजा मालेवाडा येथे टिप्परद्वारे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा माहितीवरून मौजा निलज ते उमरेड रोड भिवापुर व मौजा मालेवाडा येथे नाकाबंदी करीत असतांना १) टिप्पर क्र. एम एच– ४० सी एम ५९७० चा चालक आरोपी नामे– १) निखील भिमराव रंगारी वय २८ रा चिमनाझरी त. उमरेड याने आपल्या वाहनामध्ये ८ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/— रू प्रमाणे एकुण किमंती ४००००/— रू. असा अवैधरित्या विणापरवाना शासनाचा महसुल बुडवुन क्षमतेपेक्षा जास्त रेती भरूण वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून निळा रंगाचे १२ चक्का टिपर क्र एमएच ४० सीएम ५९७० किमंती २०,००,०००/— रू ८ ब्रास रेती प्रत्येकी ५००० रू प्रमाणे असा एकुण २०,४०,००० रू चा माल २) टिप्पर क्र एमएच –४०– सीटी– ५४४६ चा चालक आरोपी नामे– संदीप ज्ञाने वर वावरे वय २५ वर्ष रा तास ता भिवापुर हा आपल्या टिप्पर मध्ये ८ ब्रास रेती प्रत्येकी ५००० रू प्रमाणे एकुण किमंत ४०००० रू असा अवैधरित्या विणापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून निळा रंगाचे १२ चक्का टिपर क्र एमएच –४० –सीटी–५४४६ किमंती २०,००,००० रू ८ ब्रास रेती प्रत्येकी ५००० रू प्रमाणे असा एकुण २०,४०,००० रू चा माल जप्त केला. ३) १० चक्का टिपर क्र एमएच –३६–एए –३७५० चा चालक आरोपी अतुल तुळशिराम मोहरकर वय ३३ वर्ष रा. बामणी पोस्टे पालोरा ता. पवनी जि. भंडारा याने आपल्या टिप्पर मध्ये ०६ ब्रास रेती प्रत्येकी ५००० रू प्रमाणे एकुण किमंत ३०००० रू व टिप्पर किमती १५,००,०००/रू. असा अवैधरित्या विणापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून निळा रंगाचे १२ चक्का टिपर क्र एमएच –४० –सीटी–६५०४ अंदाजे ०८ ब्रास रेती प्रत्येकी ५००० रू प्रमाणे असा एकुण ,४०,००० रू व टिप्पर किमती २०,००,०००/रू. असा एकुण दोन्ही ट्रक /टिप्पर व अंदाजे १४ ब्रास रेती कि. ३५,७०,०००/— रू.चा माल असा एकुण ४ ट्रक टिप्पर मध्ये भरून असलेली ३० ब्रास रेती किमती १५००००/— रुपये तसेच ४ ट्रक टिप्परची किंमती ७५०००००/— रू. रुपये असा एकूण ७६५००००/— रुपये चा माल जप्त करण्यात आला असून पोलिस स्टेशन भिवापूर येथे आरोपी नामे– **१) निखील भिमराव रंगारी वय २८ रा चिमनाझरी त. उमरेड २) आशिश थुटे वय २४ रा सालेभट्टी ता भिवापुर ३) आशिश शंकर भोयर वय ३० वर्ष रा सिंदपुरी त पवनी जि भंडारा ४) नंदकिशोर हटवार वय ३५ वर्ष रा पाचगाव त नागपुर जि नागपुर ५) तनु धोनी वय ४० वर्ष रा पवनी त पवनी ६) पलाश ओमप्रकाश रघटाटे, रा कावरापेठ त. उमरेड जि नागपुर ७) किशोर सावरबांधे रा. खातखेडा ता. पवनी जि. भंडारा ७) संदीप ज्ञानेश्वर वावरे वय २५ वर्ष रा तास ता भिवापुर ८) अतुल तुळशिराम मोहरकर वय ३३ वर्ष रा. बामणी पोस्टे पालोरा ता. पवनी जि.भंडारा ९) शुभम बाळासाहेब गुवरे वय ३० वर्श रा. ह.मु. भांडारकर ले आॅऊट उमरेड जि. नागपुर १०) अमोल इसन वाघ वय २९ वर्ष रा. महात्मा गांधी शाळा भिसी ता. चिमुर जि. चंद्रपुर ११) स्वप्नील राऊत रा. कोल्हार ता. बुट्टीबोरी जि. नागपुर** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भादवि R/W ४८(८)(७) महसूल अधि. सह ४, २१ खान आणि खनिज अधिनियम R/W कलम ३ सर्व मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजा पवार साहेब यांचे मार्गदर्शनात पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार श्री जयप्रकाश निर्मल, पोलिस उपनिरीक्षक संदीप, परी. पोलीस उपनिरीक्षक किरण महागावे, ASI ठाकूर, राकेश त्रिपाठी, निलेश खोब्रागडे, रवि जाधव, मनोज चाचरे, निकेश आरेकर, दीपक ढोले, प्रीतम खोपे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर